ISBN: 978-93-91943-64-6 EDITION: 2023

Edited Book

# Dr. Babasaheb Ambedkar's Multidimensional Thoughts

## Editors

**Dr. Haresh T. Gajbhiye**
M.Com., M.Phil., Ph.D.
Associate Professor & HOD of Commerce
Rashtrasant Tukdoji Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

**Dr. Prafull T. Bansod**
M.A.(Marathi), M.Phil., NET., Ph.D.
Associate Professor of Marathi
Rashtrasant Tukdoji Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

**Dr. Anita V. Mahawadiwar**
M.Com., Ph.D., M.A.(Eco.)
Assistant Professor of Commerce
Bhiwapur Mahavidyalaya
Bhiwapur, Dist. Nagpur

ADHYAYAN

**Adhyayan Publishers and Distributors**
**New Delhi**

**Dr. Babasaheb Ambedkar's Multidimensional Thoughts**

**ISBN: 978-93-91943-64-6**

**EDITION: 2023**

**14 Apr. 2023**

**Publisher**

**Adhyayan Publishers and Distributors**
4378/B, 105, JMD House, Gali Murarilal,
Ansari Road, Dariya Ganj,
New Delhi - 110002.
Ph.: 011-23263018, Mob.: 91-9899349433
Email: adhyayanpublishers@yahoo.com
Website: www.adhyayanbooks.com

**Type Setter**

**Hariom Computer**
Mob.: 9673550720

**EDITORS**

**Dr. Haresh T. Gajbhiye**
M.Com., M.Phil., Ph.D.
Associate Professor & HOD of Commerce
Rashtrasant Tukdoji Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

**Dr. Prafull T. Bansod**
M.A.(Marathi), M.Phil., NET., Ph.D.
Associate Professor of Marathi
Rashtrasant Tukdoji Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

**Dr. Anita V. Mahawadiwar**
M.Com., Ph.D., M.A.(Eco.)
Assistant Professor of Commerce
Bhiwapur Mahavidyalaya
Bhiwapur, Dist. Nagpur

| | | |
|---|---|---|
| 29. | **भारतीय कृषी आणि जलसिंचनावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार**<br>प्रा. चेतन प्रभुजी चौधरी | 159 |
| 30. | **भोगा धर्माची फळं**<br>आकाश मेश्राम | 165 |
| 31. | **महिला सक्षमीकरणासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार**<br>प्रा. पितांबर व्हि. पिसे | 171 |
| 32. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामुदायिक शेतीविषयक विचार**<br>डॉ. अनिता व्ही. महावादीवार | 176 |
| 33. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार**<br>प्रा. मनोहर रामचंद्र चौधरी | 183 |
| 34. | **महिलांच्या आर्थिक विकासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान**<br>प्रा. निलेश अरूण दूर्गे | 188 |
| 35. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान**<br>डॉ. नितीन तुळशीराम कत्रोजवार | 194 |
| 36. | **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परीप्रेक्षातून भारताचा विकास**<br>डॉ. दिनकर रामेश्वर चौधरी | 198 |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामुदायिक शेतीविषयक विचार

**डॉ. अनिता व्ही. महावादीवार**

सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग

भिवापूर महाविद्यालय, भिवापूर

Mob.: 9209480491 ,Email: mahawadiwar.anita@gmail.com

**सारांश**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक, पत्रकार, विद्वान, संसदपटू, दीनदलितांचे उध्दारकर्ते अशी त्यांची ओळख संपूर्ण जगाला आहे. परंतु एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांची ओळख फार दुर्मिळ होती. त्यांनी अर्थशास्त्रज्ञ म्हणून फार कमी कार्य केले असले तरी त्यांच्या आर्थिक विचारांमध्ये या देशातील सामाजिक समानतेच्या विचारांची बाजू फार मजबूत जाणवते. त्यांचे उच्च पातळीवरील तत्वज्ञान जास्त नसून प्रत्यक्ष जीवनातील प्रश्न जगातील अनेक देशातील आर्थिक रचनांच्या संदर्भात विचारांत घेतलेले दिसतात.

भारतात आर्थिक विचारांच्या पध्दतशीर मांडणीला एकोणविसाव्या शतकापासून सुरूवात झाली. 1918 मध्ये 'The Journal of Indian Economic Society' मध्ये त्यांचा लेख प्रकाशित झाला. हा लेख तयांनी 'लहान धारण क्षेत्रे आणि त्यांवरील उपाय' या विषयावर लिहिला. 1921 मध्ये डॉ. आंबेडकर खरोखरच अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले गेले. 'स्टेट्स अँड मायनॉरिटीज' या पुस्तिकेत डॉ. आंबेडकरांनी सामुदायिक शेती तसेच शेती-संघटनाची आपली योजना सादर केली. कारण तेव्हा भारतामध्ये शेती संघटनांच्या जमीनदारी, रयतवारी पध्दती प्रचलित होत्या. त्यामुळे जमीन कसणाऱ्याला न्याय, उत्पादनाच्या प्रेरणांना चालना यासारख्या बाबींवर प्रतिकूल परिणाम होत होता. हे डॉ. आंबेडकरांच्या ध्यानात येताच त्यांनी आपली सामुदायिक शेतीची कल्पना मांडली भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो' अशी वाक्ये पिढ्या न् पिढ्या ऐकविण्यापेक्षा व्यक्तिवादाला मुरड घालून सामुदायिक शेती स्वीकारणे हाच व्यवहार्य मार्ग आहे. असे डॉ. आंबेडकरांनी भारतीय जनतेला पटवून दिले.

**कळीचे शब्द (Key Words):** डॉ. आंबेडकर, सामुदायिक शेती, भूमिहीन मजुर, शासन, भांडवल, उत्पादकता.

**प्रास्ताविक**

भारतात आर्थिक विचारांच्या पध्दतशीर मांडणीला एकोणविसाव्या शतकापासून सुरूवात झाली. विसाव्या शतकाच्या मध्यकाळापर्यंत भारतीय शेती दुरावस्थेत होती. स्वातंन्त्र्यप्राप्तीनंतर या क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी बरीच उपाययोजना झाली. परंतु तोपर्यत ही शेती तिच्यामध्ये गुंतलेल्या प्रचंड लोकसंख्येला वाजवी जीवनमान देऊ शकत नव्हती. शेतीची अल्प उत्पादकता हा प्रमुख प्रश्न होता. या अल्प उत्पादकतेमागे अनेक कारणे होती. भारतीय शेती ही मान्सूनवर अवलंबून आहे. मान्सूनचा लहरीपणा लक्षात घेता पाणीपुरवठ्याच्या सोयी तसेच सिंचनाच्या सोयी फारशा विकसित झाल्या नव्हत्या. कृषी क्षेत्रातील हरित क्रांती ही बरीच नंतरची घटना होती. तरीही त्याकाळी शेतीच्या उत्पादकता वाढीसाठी काही यशस्वी प्रयोग होत होते. त्यामुळे शेतकरी प्रभावितही होत होते. परंतु शेतकऱ्यांजवळ असलेल्या भांडवलाच्या कमतरतेमुळे त्यांना हे प्रयोग यशस्वी करणे शक्य होत नव्हते. शेतीची सर्वसाधारण कामे करण्यासाठी लागणाऱ्या पशूंची संख्याही दुष्काळामुळे कमी होत होती. अशा स्थितीत शेतीची उत्पादकता वाढविणे शक्य नव्हते. दुसऱ्या बाजूने शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या प्रचंड होती. परंतु त्यामानाने प्रत्यक्ष लागवडीखालील जमिनीचे प्रमाण कमी होते. त्यामानाने पडीत जमिनीचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात होते. कमी उत्पादकता असणारी ही शेती देशातल्या जनतेला पोसू शकत नव्हती. तरीही लोकांमधील शेतीविषयक प्रेम कमी होत नव्हते. थोडी का होईना आपल्या मालकीची जमीन असावी असे सर्वांना वाटत होते. यासाठी वारसा हक्काच्या का्ायद्याचा आधार घेऊन जमिनीचे विभाजन व अपखंडनाची क्रिया सतत होत होती. याचा परिणाम जमिनीचे अकिफायतशीर धारण क्षेत्र निर्माण झाले. त्या जमिनीतून पुरेसे अन्नधान्यही निघत नव्हते. याचा परिणाम शेतीची दुरावस्था तर निर्माण झालीच व शेतकरी आर्थिकदृष्ट्या कमकुवत होऊ लागला. यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामुदायिक शेतीच्या कल्पनेचा प्रवास सुरू झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारातील हे तत्वज्ञान त्यांना येणाऱ्या परिपूर्ण अनुभवावर आधारित आहे.

**आंबेडकरांचा जीवन परिचय**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म 14 एप्रिल, 1891 मधे मध्यप्रदेशातील महु येथील सैन्य छावणीत झाला. डॉ. भीमराव आंबेडकर यांच्या वडिलांचे नाव रामजी मालोजी सकपाल आणि आईचे नाव भीमाबाई होते. आपल्या आई - वडिलांचे ते चैदावे पुत्ररत्न होते. जन्मजात ते प्रतिभासंपन्न होते. लहानपणी आंबेडकरांच्या कुटुंबासोबत सामाजिक आणि आर्थिक बाबतीत फारच भेदभाव केल्या जात होता. आंबेडकर यांच्या पूर्वजांनी खूप वर्षपर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या सेवेत आपला जीवनकाळ घालविला. त्यांचे वडील सुध्दा ब्रिटिश भारतीय सेनेच्या महु छावणीत सेवेत होते. भीमरावांचे वडील नेहमीच आपल्या मुलांच्या शिक्षणावर जोर देत. 1994 ला भीमराव आंबेडकर यांचे वडील सेवानिवृत्त झाले. आणि त्यानंतर 2 वर्षांनी आंबेडकरांच्या आईचा मृत्यू झाला. आईच्या मृत्यूनंतर त्यांच्या काकूने अत्यंत कठीण परिस्थितीत आंबेडकरांच्या बहीण-भावंडाचे

पालनपोषण केले. आंबेडकरांच्या वडिलांना बलराम, आनंदराव आणि भीमराव असे तीन मुले व मंजुळा आणि तुळसा नावाच्या दोन मुली होत्या. आपल्या संपूर्ण भावंडांमध्ये फक्त भीमराव आंबेडकर यांनीच शिक्षण घेतले. शिक्षण घेत असतांना महादेव अंबावडेकर नावाचे शिक्षक त्यांना लाभले. या शिक्षकांचे ते लाडके विद्यार्थी होते. त्यामुळे त्यांच्या सांगण्यावरून भीमरावांनी आपले सकपाल आडनाव बदलून आंबेडकर ठेवले.

**शिक्षण**

आंबेडकरांनी सातारा शहरात राजवाडा चैकातील सरकारी हायस्कूलमध्ये 7 नोव्हेंबर, 1900 या वर्षी इंग्रजी माध्यमाच्या पहिल्या वर्गात प्रवेश घेतला. याच दिवसापासून त्यांच्या शैक्षणिक जीवनाला खरा प्रारंभ झाला. यानंतर भीमरावांनी आपले माध्यमिक शिक्षण एल्फिस्टोन रोड येथील गव्हंनमेंट हायस्कूलमध्ये पूर्ण केले. एप्रिल 1906 ला भीमराव जेव्हा 15 वर्षाचे होते तेव्हा 9 वर्षाची रमाबाई यांच्या सोबत ते विवाहबंधनात अडकले तेव्हा ते पाचव्या वर्गात शिकत होते. 1907 मधे मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण करून एल्फिस्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. 1912 मध्ये बी.ए. ची पदवी पूर्ण करून 1913 मध्ये 22 व्या वर्षी ते संयुक्त अमेरिकेत न्युयार्क येथील कोलंबिया विश्वविद्यालयात पदव्यूत्तर शिक्षणासाठी गेले. 1915 मध्ये कला शाखेतील स्नातकोत्तर परीक्षा पास झाले. पुढे 1916 मध्ये लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये प्रवेश घेऊन अर्थशास्त्रातील आचार्य पदवीचे काम सुरू केले. विदेशात जाऊन अर्थशास्त्रातील आचार्य पदवी घेणारे भीमराव हे पहिलेच भारतीय होते. त्यावेळी त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी औद्योगिकरण व कृषीविकास आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. त्यांनी या संशोधनात सामाजिक बाजूचाही विचार करून अध्ययनावर भर दिला. आर्थिक आणि सामाजिक विकास, शिक्षण, सार्वजनिक स्वच्छता, समुदाय स्वास्थ्य इ. बाबींवरही जोर दिलेला दिसून येतो. त्यांनी ब्रिटिश सरकारमुळे देशाला होणाऱ्या नुकसानीचीही चिंता व्यक्त केली.

**एक अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळख**

1921 मध्ये डॉ. आंबेडकर खरोखरच अर्थशास्त्रज्ञ म्हणून ओळखले गेले. जेव्हा राजकारणात त्यांनी नेता म्हणून सक्रीय सहभाग घेतला तेव्हा त्यांनी अर्थशास्त्र या विषयातील 'ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ दी ईस्ट इंडिया कंपनी' 'द इव्हॅल्युएशन ऑफ प्रॉविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश 'इंडिया द प्रॉब्लेम ऑफ द रूपीः इट्स ओरिजिन ॲन्ड इट्स सोल्युशन' इ. तीन महत्वपूर्ण पुस्तके लिहिली. 'ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ दी ईस्ट इंडिया कंपनी'या प्रबंधात आंबेडकर यांनी सन 1792 ते 1858 मध्ये ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित व्यवस्थेमध्ये कसे बदल झाले व ते भारतीयांकरिता कसे अन्यायकारक ठरले याविषयी आपले विचार व्यक्त केले. ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय जनतेची प्रचंड पिळवणूक केली. या काळात कंपनीचा जो महसूल वाढला त्यात 54 टक्के वाटा जमिनीवरील कराचा होता यामुळे शेतकरी वर्गाची फार पिळवणूक झाली. हे त्यांनी जनतेच्या लक्षात आणून दिले. समाजातील दुर्बल तसेच असंघटित घटक असणाऱ्या शेतकऱ्यांची त्यांना सतत काळजी

वाटायची. कारण भारत देश हा कृषीप्रधान देश आहे. या देशात राहणारी जास्तीत जास्त जनता शेतीवर अवलंबून आहे. तरीही या देशात राहणारा शेतकरी आजही दारिद्र्यातच जीवन जगतो. हे कारण जरी खरे असले तरीही या कारणाच्या मुळाशी नेमकी कोणती बाब दडलेली आहे हे शोधून काढण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विविध क्षेत्रात आपले योगदान दिले. समाजासाठी त्यांनी सतत त्यागाचीच भूमिका ठेवली. याला कृषीक्षेत्रही अपवाद नव्हते. ग्रामीण भागात कृषीवर लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडलेला दिसून येतो. हा भार कमी होवून शेती एक व्यवसाय म्हणून समजली जावी यासाठी कृषीविषयक समस्या दूर होणे गरजेचे होते. हीच बाब आंबेडकरांनी जाणली आणि सामुदायिक शेतीचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. भारतीय शेतीशी निगडित आर्थिक समस्यांची ही सामाजिक बाजू केवळ आंबेडकरांसारखाच अर्थशास्त्रज्ञच विचारात घेऊ शकला.

## सामुदायिक शेती व शेती संघटन याबाबतची आंबेडकरांची कल्पना

शेती संघटनेच्या दृष्टीने विचार करता त्याकाळी भारतात जमीनदारीसारख्या अनिष्ट प्रथांचा सुळसुळाट होता. या पध्दतीमुळे मालकी हक्काची वाढ होऊन मोठा परोपजीवी वर्ग निर्माण झाला. कुळांच्या आणि पोटकुळांच्या मार्फत करण्यात येणाऱ्या या शेतीमध्ये अवास्तव खंडामुळे कुळांचे शोषण होत होते. यामुळे उत्पादन वाढीची प्रेरणा नष्ट होत होती. लागवडीखालील जमिनीचे प्रमाण कमी होत होते. त्यामुळे बेकारीचे वाढते प्रमाण निर्माण होऊन निरूद्योगी शेतमजुरांचा वाढता वर्ग निर्माण होत होता. डॉ. आंबेडकरांना अर्थशास्त्रज्ञ या नात्याने या संपूर्ण परिस्थितीची जाणीव होती. तसेच सामाजिक विषमतेच्या आगीत होरपळणाऱ्या असंख्य ग्रामीण बांधवांच्या स्थितीचे भानही होते. म्हणूनच त्यांचे असे मत झाले की, 'धारणक्षेत्रांचे एकत्रीकरण काय किंवा कूळ कायदे काय, हे उपाय विचारात घेणे व्यर्थ आहे त्यामुळे शेतीत सुबत्ता येणे शक्य नाही. तसेच निव्वळ भूमिहीन मजूर असणाऱ्या 60 दशलक्ष अस्पृश्यांचे प्रश्नसुध्दा यामुळे सुटणे शक्य नाही.' अशाप्रकारे आर्थिक समस्यांची ही सामाजिक बाजूही आंबेडकर आपले मत मांडतांना लक्षात घेत होते.

भारतामध्ये ज्या शेती-संघटनांच्या जमीनदारी, रयतवारी पध्दती प्रचलित होत्या. या पध्दतीमध्ये शेतीसुधारणा, उत्पादकतेची वाढ, जमीन कसणाऱ्याला न्याय, उत्पादनाच्या प्रेरणांना चालना यासारख्या बाबींवर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या होत्या. कुळाच्या मेहनतीवर जगणाऱ्या वर्गाला पोषक अशी ही रचना नष्ट करण्यशिवाय उपाय नव्हता. तिच्या जागी 'कसेल त्याची जमीन' या तत्वाला मान्यता देणारी वैयक्तिक कास्तकारी आणण्याला बहुसंख्य लोक अनुकूल होते. सहकारी शेतीला पाठिंबा मिळत असला तरी तिच्या व्यावहारिकतेबाबत शंका होती. या संपूर्ण परिस्थितीचा विचार करून आंबेडकरांनी सामुदायिक शेतीपध्दतीची शिफारस केली. शासनाचा पुढाकार व मदत आणि खेड्यातील भूमिहीन मजुरांसह सर्वांचा सक्रिय सहभाग अशी त्यांची सामुदायिक शेतीची संकल्पना होती. सामुदायिक शेतीच्या माध्यमातून जमीनदारी पध्दती नष्ट करून आणि वैयक्तिक कास्तकारी रूढ करूनही असे अनेक प्रश्न होते ज्यांचे निराकरण होणे कठीण होते. या प्रश्नांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

1. शेतजमिनीचे छोटे तुकडे व अकिफायतशीर आकार तसाच राहणार होता.
2. लाखोंच्या संख्येने असलेल्या भूमीहीन मजुरांना दिलासा मिळण्याची खात्री नव्हती.
3. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी जमीन या घटकासोबत इतर साधनांची जोड मिळणे आवश्यक होते. पण दारिद्रयाने ग्रासलेल्या शेतकऱ्यांजवळ भांडवलाची कमतरता असल्याने उत्पादकतेत वाढ होणे कठीण होते.
4. छोट्या आकारामुळे तसेच भांडवलाच्या कमतरतेमुळे कायम सुधारणा अंमलात येऊ शकत नव्हत्या.
5. शेतीच्या उत्पादनतंत्रात जो काही कालानुरूप बदल झाला असता तो वैयक्तिक कास्तकारीत अनुसरणे कठीण होते.

वर उल्लेखित अनेक समस्यांपैकी बऱ्याच अडचणी सोडविण्यास सामुदायिक शेतीपध्दत सक्षम होती. या संघटन प्रकारामुळे किफायतशीर आकाराची मोठी क्षेत्रे लागवडीखाली आली असती. शासनाच्या निधीतून भांडवल मिळाले असते. उत्पादकता वाढीच्या नवनवीन प्रयोगांना वाव मिळाला असता विशेष म्हणजे ग्रामीण भागातील भूमिहीन मजुरांना सन्मानपूर्वक जगण्याचा शाश्वत आधार मिळाला असता. हे जरी खरे असले तरी त्याकरिता जमिनीवर सामाजिक मालकी प्रस्थापित होणे अनिवार्य होते. परंतु याच गोष्टीसाठी सामुदायिक शेतीपध्दतीचा वारंवार विरोध होत गेला. कारण भारतीय फार व्यक्तिवादी आहेत. भारतीयांना ही पध्दत व्यक्तिगत हक्कावर आक्रमण करणारी वाटू लागली.

## सामुदायिक शेतीची प्रस्तावित योजना

'स्टेट्स अँड मायनॉरिटीज' या पुस्तिकेत डॉ. आंबेडकरांनी शेती-संघटनाची आपली योजना पुढीलप्रमाणे सादर केली.

1. **शेतजमिनीची मालकीः** सामुदायिक शेतीच्या दिशेने पहिले पाऊल म्हणजे शासनाने जमीनदारी पध्दत नष्ट करून जमिनीमधील खाजगी मालकीहक्कांचे अधिग्रहण करणे होय. जमिनदारांच्या जमिनी दुसऱ्यांच्या बळकावलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना नुकसानभरपाई देण्याची गरज नाही. तरीही आंबेडकरांनी अशा व्यक्तीना ऋणपत्रांच्या स्वरूपात भरपाई दिली जावी अशी शिफारस केली. प्रत्यक्षात मात्र स्वातंत्रयप्राप्तीनंतर मध्यस्थांच्या उच्चाटनाचे कायदे करण्यात आले व नुकसान भरपाईही देण्यात आली. जमिनदारांकडून घेतलेली जमीन शासनाने न ठेवता ती गरजूंना देण्याच्या धोरणामुळे अनेक वाईट प्रकार घडून आले. ही परिस्थिती लक्षात घेता डॉ. आंबेडकरांनी आपली योजना घटनात्मक कायद्याने लागू करण्याचा आग्रह धरला. ही योजना संविधानाचा एक भाग झाल्याने स्वार्थी लोंकांना याचा गैरफायदा घेता आला नसता व अतिक्रमण झाल्याची त्यांच्यात भावनाही निर्माण झाली नसती.

2. **शासनाची जबाबदारीः** खाजगी मालकी हक्क असलेली सर्व जमीन अधिग्रहित केल्यावर शासनाने पुढील कार्यवाही करावयाची होती. सर्वप्रथम खेड्यामधील जमिनीची विभागणी प्रमाणित आकाराच्या शेतांमध्ये करणे अपेक्षित होते. योग्य आकाराची प्रक्षेत्रे लागवडीसाठी काही कुटुंब मिळून बनलेल्या ग्रामीण कुळांना दिली गेली असती, हे सर्व करतांना जात, धर्म यासारखा विचार करावयाचा नव्हता. जमीनदार, कुळ, भूमिहीन मजूर असे भेदही न करता लागवडीची तरतूद करणे अपेक्षित होते. प्रत्यक्ष लागवड कशी करावयाची याविषयीचे निर्देश देण्याची जबाबदारी शासनाची होती. तर मुख्य प्रश्न शेतीला भांडवल व साधनांचा पुरवठा करण्याचा होता त्यासाठी पाणीपुरवठा, जनावरे, अवजारे, खते, बियाणे इ. आवश्यक सोयी शासनच करणार होते.
3. **लोकांचे हक्कः** सामुदायिक शेतीच्या योजनेत जमिनीची मालकी जरी शासनाची असली तरी काम करणाऱ्या लोकांना निश्चित असे हक्कही होते. खेड्यातील प्रत्येक कुटुंबाला लागवडीसाठी जमीन मिळण्याचा हक्क होता. शेतजमिनीचे विभाजन-अपखंडन व अकिफायतशीरपणा टाळून कास्तकारांना व भूमिहिनांना हा हक्क प्राप्त होणे महत्वाचे होते. याशिवाय साधनांचा आश्वस्त पुरवठा यामुळे शेतीच्या उत्पादकतेत व पर्यायाने उत्पन्नात वाढ झाली असती. सामुदायिक पध्दतीने करावयाच्या या लागवडीचे उत्पन्न आपसात वाटून घेण्याचा कुळांना अधिकार होता.
4. **शासनाचे हक्कः** सामुदायिक शेतीपध्दतीत जमीन ही निसर्ग संपदा असल्याने ती सामाजिक मालकीची आहे त्यामुळे प्रतिनिधिक शासनाला काही हक्क प्राप्त होतात. या लागवडीतून जे उत्पादन होईल त्याचा एक भाग जमीन महसुलाच्या रूपाने शासनाच्या तिजोरीत जाणार होता. शासनाने जमीन ताब्यात घेतांना जी ऋणपत्रे दिली त्याचे पैसे देण्यासाठी या महसुलाचा उपयोग होणार होता. याशिवाय लागवडीसाठी आवश्यक अशा विविध सोयी-सुविधा शासनाने पुरविल्या असल्याने त्यांचा योग्य तो मोबदला आकारण्याचा अधिकारही शासनाला असेल. याशिवाय दुसरी महत्वाची बाब म्हणजे सामुदायिक शेतीच्या मूळ तत्वाला हानी पोचेल असे कोणतेही कृत्य कुळांद्वारे होता कामा नये व असे झाल्यास दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार शासनाचा राहील अशी यामध्ये तरतूद केल्या गेली होती.

अशाप्रकारे डॉ. आंबेडकरांनी सूचविलेली सामुदायिक शेतीची कल्पना तसेच शेती संघटन व्यक्तिकेंद्रीत विचारसरणीला पटणारी नसली तरी त्यामुळे शेतीशी निगडित अनेक प्रश्न सुटणे शक्य होते.

भारतामध्ये राज्य-समाजवादाची रचना घटनात्मक कायद्याने लागू व्हावी जिचा एक भाग सामुदायिक शेती होता. यासाठी डॉ. आंबेडकरांनी 'स्टेट्स अँड मायनारिटीज' मधील अनुच्छेद दोन ही तरतुद सुचविली. जेणेकरून शेतीशी संबंधित बरेचसे प्रश्न सुटतील. सन 1947 मधे ही पुस्तिका प्रकाशित होण्यापूर्वीच त्यांनी शेतीच्या विविध समस्यांवर विचार केला तेव्हा त्यापैकी भारतातील छोटी धारण क्षेत्रांची समस्या त्यांना जास्त गंभीर वाटली होती. छोट्या धारण क्षेत्राची समस्या जो पर्यंत

सुटणार नाही तोपर्यंत सामुदायिक शेतीची प्रस्तावित योजना योग्य आकार घेणार नाही हे त्यांना कळून चुकले होते. केवळ छोट्या धारणक्षेत्रांमुळे समस्या निर्माण होत नाही तर या धारणक्षेत्रांसोबत लागणारी आवश्यक साधने कमी पडत असल्याने ती धारणक्षेत्र अकिफायतशीर ठरते. म्हणजे छोट्या धारणक्षेत्रांच्या समस्या दूर करण्याचा उपाय केवळ त्यांचा आकार वाढविणे हा नसून भांडवली साधने वाढविणे हा असायला हवा. यासाठी डॉ. आंबेडकरांनी सांगितलेल्या प्रस्तावित सामुदायिक शेतीचा योग्य तो विचार भारतातील लोकांनी केल्यास सामाजिक न्याय व समता प्रस्थापित होण्यास मदत होईल. व देशातील गरीब व श्रीमंत यामधील अंतरही कमी होणे शक्य होईल.

## संदर्भ ग्रंथसूची


1. Sunil Kumar, 6 Ambedkar's Economic Ideas & Contribution, IOSR Journal of Humanities and Social Science, Volume-24, Issue 3, ser 1 (March 2019), E-ISSN, 2279-0837.
2. Chavan, Prof. Shalaka Prakash, 'Role of Dr. Babasaheb Ambedkar in Economics,' South-Asian Journal of Multidisciplinary Studies, ISSN - 2349-7858:2. 246: Volume 4, Issue-6.
3. Bharatdarshan.co.nz/magazine/article/child/170/Ambedkar-biography. html
4. निकम, डॉ. छाया, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरः विचारधारा आणि साहित्य निर्मिती', प्रथमावृत्ती 1 जून, 2008, सुविधा प्रकाशन, पुणे.
5. शास्त्री, डॉ. सुधाकर दा. देहलीवाल, डॉ. प्रकाश, 'भारतीय अर्थशास्त्र - 2', संशोधित द्वितीयावृत्तीः डिसेंबर 2019, विश्व पब्लिशर्स ॲन्ड डिस्ट्रिब्युटर्स, नागपूर.
6. कविमंडन, डॉ. विजय, 'डॉ. आंबेडकरांचे आर्थिक चिंतन', प्रथम आवृत्ती 2012, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर.
7. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब, 'माझी आत्मकथा', मधुश्री पब्लिकेशन, नाशिक
8. जाटव, डी. आर., 'अम्बेडकर-आचार-विचार संहिता', प्रथम संस्करण 2007, ए. बी. डी. पब्लिशर्स, जयपूर.
9. सिंह, रामगोपाल, 'अंबेडकर - 'सामाजिक न्याय एवं परिवर्तन', प्रथम संस्करणः 2006, नॅशनल पब्लिशिंग हाऊस', जयपूर एवं दिल्ली.
10. मल, डॉ. पुरण, 'बाबा साहब - डॉ. बी. आर. अम्बेडकरः जीवन और संघर्ष', प्रथम संस्करणः 2008, पोइन्टर पब्लिशर्स, जयपूर.